म. ग्रं. सं. ठाणे

विषय

लेखक [illegible]

सन

संग्रहालय क्रमांक

पुस्तकाचें नांव [illegible]

युरोपा काकूच्या शाळेंतील मारामारी.

जर्मन् मुलानें फ्रेन्च मुलाला कसें ठोकलें;

व

इंग्लिश मुलगा,

ती मौज पहात कसा उभा राहिला, हें ह्या पुस्तकांत दाखविलें आहे.

मुंबई मध्यें:
एशियाटिक छापखान्यांत छापिलें
सन १८७१

किंमत १२ आणे

नं. १००३
ठाणें सन १८९०
५
११

उपोद्घात.

अलिकडे युरोपांतील कित्येक संस्थानांची स्थितीइतकी विघडून गेली आहे कीं, जुलूम आणि अंधाधुंदी या दंपत्या नें आपला अमल तेथें सुलभ रीतीनें बसविला आहे.

स्पेन देशच्या प्रजेनें ह्मणजे प्रजेच्या नावानें कारस्थानी लोकानीं, जुलुमापासून स्वदेश सोडविण्याच्या निमित्तानें सन १८६८ त राणीस हाकून लावून, खरोखर ज्यास जुलूम ह्मणतात त्यास आमंत्रण करून राज्यांत आणिलें. ज्या दिवसापासून राज्यास राजकर्त्ता नाहींसा झाला, त्या दिवसापासून कारस्थानीं गृहस्थांहीं निरनिराळ्या राजांस आणि राजपुत्रांस स्पेनचा राजमुकुट स्वीकारावा ह्मणून मूळ पाठविलें, परंतु कोणी तो स्वीकारीना.

फ्रान्स देशाच्या उजवे बाजूस जर्मनी व प्रशिया देश आहेत, आणि डावेकडेस स्पेनदेश आहे, हें आमच्या सर्व मित्रांस ठाउकच आहे. या मुळे प्रशिया देशाचे प्रति नानाफडणवीस बिस्मार्क साहेब, याणीं पाहिलें

कीं, जर आपल्या यजमानाच्या कुळांतील एकादा राजपुत्र स्पेनदेशाच्या सिंहासनावर नेऊन स्थापला, तर आपल्या राज्याची वढती होईल एवढेंच नाहीं, परंतु अन्य कांहीं हेतु जे त्याच्या व उइल्यम राजाच्या मनांत होते, तेही सहजें सिद्धीस जाऊन, आपलें राज्य सदृढ होऊन, विस्तीर्ण दशेस पोंहचेल; आणि आपला राजा युरोपांतील राजमालेचा मुख्य मणी होईल.

जर्मन देशांत लहान लहान अशीं पुष्कळ संस्थानें आहेत, त्यांतून कांहीं प्रशियाच्या राजास अवलंबून होतीं व कांहीं फ्रान्स देशाच्या बादशहास अवलंबून होतीं. बिस्मार्क जो मोठा बुद्धिवान्, व राजकारभारांत आणि राजकारस्थानांत कुशळ असून चतुर आहे, त्याचा मुख्य हेतु असा होता कीं, ह्या सर्व लहान लहान संस्थानांचा एकोपा करून, प्रशियाचाराजा त्यांचा मुख्य नायक करावा; ह्मणजे फ्रान्स देशाकडेस जो थोड्यांचा कल आहे, तो मोडून जाईल. हा एकोपा करण्यास त्याला हीच संधी फार चांगली दिसून आली; कारण कीं होयनझॉलर्न हा जर्मन राजपुत्र असून, उइल्यम राजाचा लगत नातलग आणि गळ्यांतला मणी आहे; आणि स्पेनदेश त्याला मिळाला असतां तो आपल्या

राजास मदत देऊं शकेल, व त्यां उभयतांच्या राज्यांमध्यें फ्रान्सदेश पडला या कारणानें, त्यांच्या मर्जीस पडेल तेव्हां फ्रांन्स देशास दोनहीकडून उपद्रव देण्याविषयीं, व कांहीं वर्षांमागें फ्रेंच लोकांही जर्मनीकडून आल्सास् आणि लॉरेन् ह्या नावांचे जे प्रांत, बळकाविले होते, ते परत हस्तगत करून घेण्याविषयीं अडचण पडणार नाहीं. आणि असें झाल्यामुळें जर्मन् संस्थानें जीं नेपोल्यन् बादशहास अवलंबून होतीं, त्यांचा विश्वास त्याचेवरून उडून जाईल, आणि सहजच तीं एकोप्याला मिळतील, असें बिस्मार्कानें आपल्या च्यातुर्यानें सिद्ध केलें, आणि त्याचप्रमाणें पुढें एकोपा झाला.

होयनझॉलर्न राजपुत्रानें स्पेनची गादी स्वीकारली, असें जेव्हां नेपोल्यन् बादशहाला समजलें, तेव्हां त्याणें उइल्यमास आपल्या वकिलाकडून कळविलें कीं, त्याच्या आप्तानें जी स्पेनची गादी आपल्या अनुमत्ता शिवाय स्वीकारली, हें ठीक केलें नाहीं, याकरतां त्याजकडून तो स्वीकार नाकारवावा. युरोपांतील मोठमोठ्या राजांचींही मतें याप्रमाणेंच पडलीं, यासाठीं प्रशियाच्या राजानें होयनझॉलर्नाकडून स्पेनचा अंगीकार नाकबूल करविला. असें असतांही नेपोल्यन्

बादशहानें, उइल्यम राजाकडून 'मी होयनझोलर्नास स्पेनचें राज्य कधींच स्वीकारण्यास देणार नाहीं.' असा लेख मागितला ह्मणून राजास राग येऊन बेपर्वाइने बादशहाच्या वकिलास कांहींच उत्तर न देतां परत पाठवून त्याचा अपमान केला.

या अपमानामुळें नेपोल्यन् भारीच क्रोधायमान झाला, त्याचा तसा अपमान तोंपर्यंत युरोपखंडांत कोणत्याच राजानें केला नव्हता. सर्वत्र सख्य राखण्याकरितां जे जे नियम तो बांधित असे, ते ते नियम सर्व राजे कबूल करीत असत, व सर्वांस त्याचा दरारा होता. अशा प्रकारचा दरारा आज नाहींसा झाला, आणि उद्यां दुसऱ्याकडून याहून विशेष अपमान होईल, यास्तव आपल्या सामर्थ्याचा विचार नकरितां एकाएकींच प्रशियाच्या राजाशीं त्याणें लढण्याचा बेत केला.

सन १८६७ मध्यें डेन्मार्कच्या राजाकडून घेतलेल्या प्रदेशाविषयीं ऑस्त्रियाच्या बादशहाशीं जी उइल्यमाची लढाई झाली, आणि त्या प्रसंगीं ज्या नवीन शस्त्रांची त्याणे योजना केली, आणि सैन्य रचनेच्या कौशल्यानें जय मिळविला, त्यावरूनच त्याच्या शौर्याची परिक्षा झाली आहे. तो आधींच युद्धास तयार होता

त्यांत याचें त्याला आमंत्रण गेलें, मग काय विचारा-याचें! हां हां ह्मणतां सैन्यासहवर्त्तमान येऊन तो फ्रान्सच्या राज्यांत पडला, आणि नेपोल्यनाचे फौजेची त्याणें दाणादाण करून टाकली.

सन १८७० च्या जुलई महिन्याचे १५ वे तारिखेस बादशहाच्या कचेरींत युद्धाचा निश्चय ठरला, आणि साआरब्रक्, विसेम्बर्ग, ओयर्थ, स्ट्रास्बर्ग, मेत्झ बेन्जानविल व चालन् वगैरे ठिकाणी मोठमोठाल्या लढाया होऊन, शेवटीं त्याच वर्षाच्या सप्तंम्बर महिन्याचे २ रे तारिखेस सेडान् येथें जी प्रख्यात व अचंब्याची लढाई झाली, त्याप्रसंगीं एक लाख फौज आणि मोठमोठे नामांकित सरदार यां सहवर्त्तमान नेपोल्यन् बादशहास, प्रशियाच्या राजानें बंदिवान करून आपल्या राज्यांत पाठवून दिला.

पुढें मग तह करावा तर आपल्या हातीं तह करण्याचा अधिकार नाहीं, असें फ्रान्सच्या बादशहानें सांगितल्यावरून, प्रशियाच्या राजानें सैन्या सहित येऊन पारीस शहरास वेढा दिला.

फ्रेंच लोक जरी शौर्यवान् आहेत तरी अलिकडे ते ख्यालखुशालींत पडल्या कारणानें अगदीं आळशी होऊ-

न गेले आहेत, अशा लोकांला त्या प्रखर जर्मन शूरांशीं जाऊन भिडणे जरी कठीण होतें, तरी त्यांणीं त्यांचे समोर बराच टिकाव काढला. आणि शेवटीं जेव्हां अगदींच जर्जर झाले, व मोठमोठाल्या तोफांच्या गोळ्यांमुळें राहायास ठिकाण नाहीं, व शहरांतलें धान्य संपल्या वरून खायास अन्न नाहीं, असें झालें, तेंव्हां फ्रेंच लोकांनां तह करणें जरूर पडलें. तहनामा गेल्या एप्रील महिन्यांत झाला व त्यांत असें ठरविलें कीं, आलसास् आणि लॉरेन् हे दोनही प्रांत व दोनशें कोटी रुपये फ्रान्स देशाने जर्मनीस द्यावे.

फॉन् माल्टकी, प्रशयन राजाचा सेनापती याणें या सर्व लढाईत जी चतुराई केली, तसी युरोप खंडात तोंपर्यंत कोणास साधली नव्हती, आणि तेणे करून त्याचें नांव अमर होऊन राहील यांत संशय नाहीं.

ह्या लढाईंत त्यां उभय प्रतिस्पर्ध्यांचा पक्ष कोणीच स्वीकारला नाहीं. इंग्लिशांनीं आपल्या शेजाऱ्याचा पक्ष धरिला नाहीं हें वाईट केलें, हा ह्या रूपकाचा हेतु आहे.

भाषांतरकर्त्ता.

सं. का. ६०४

युरोपा काकूच्या शाळेंतील मारामारी.

*युरोपा काकूने एक शाळा घातली होती, आणि त्या शाळेंतलि मुलांनां ती अलिकडच्या चालू भाषा, किल्ल्यांची रचना, आणि गोल वापरण्याची पद्धति हे विषय चांगले शिकवीत असे. तिचा सुहृत्संबंध चांगल्या स्थळीं होता, आणि या प्रकारची पक्की व विपुल शिक्षा प्राप्त होण्याजोगी तेथें दुसरी शाळा नसल्यामुळें, तिची अब्रूही मोठी वाढली होती. तिच्या जुन्या शिष्यांपैकीं बहुतेकांनीं दुसऱ्या मोठमोठ्या शाळांमध्यें शिक्षकांची कामें पत्करिलीं होतीं. त्यांपैकीं दोन शाळांमध्यें बहुधा काळसर आणि अगदीं मूर्ख असे मुलगे असून, त्यांच्या वयाच्या मानानें पाहिलें असतां,

* यूरप खंड.

त्यांची अकलही कमी होती; तिसरी एक शाळा आलि-कडील मोठ्या विद्यालयांप्रमाणें असून, ती कांहींशा अकडबाज मुलांनीं भरून गेली होती; ते मुलगे आपल्या शाळेच्या व्यवस्थेविषयीं मोठमोठाल्या वाता झोकीत, आणि बोलतानां बहुतकरून नाकातून बोलत असत.

युरोपा बाईच्या शाळेंत सर्व प्रकारचीं मुलें होतीं. चांगलींही होतीं आणि वाईटही होतीं, हुशारही होतीं आणि मूर्खही होतीं, मेहनतीही होतीं आणि आळशीही होतीं, शांतही होतीं आणि उनाडही होतीं,—सारांश, यामुळें त्या म्हातारे बाईला सर्वांवर नजर ठेवणें दिवसें दिवस अम्मळ कठिणच वाटूं लागलें; तशांत सुटीच्या वेळीं शाळेसमोरच्या पटांगणांत पोरें खेळत असतां, त्यांच्या मागून छडी घेऊन शिक्षकांनी धावावें हें कांहीं तिला आवडेना; म्हणून तिणें आपल्या जाणत्यां व विश्वासू शिष्यांतून पांच पट्टशिष्य निवडून काढले, आणि त्यांला सांगितलें कीं, त्यांही सर्व मुलांवर देखरेख करावी, आणि कोणी दंगा करितील तर त्यांचा बंदोबस्त ठेवावा. असे पट्टशिष्य मागें पुष्कळ होऊन गेले, परंतु आलिकडच्याचींच मात्र नावें लिहितों, तीं

येणेंप्रमाणें:— *लुई, उइल्यम्, आलेक्, योसफ् आणि ड्यॉन.

लहान मुलांमध्यें, जर एकादें भांडण लागलें, तर पट्टशिष्यांहीं त्याची चौकशी करावी, व त्यांची समजूत पाडून भांडण मिटवून टाकावें, आणि त्यांची कुस्ती चालूं दिल्या वांचून तें तुटायाचें नाहीं, असें जर दिसलें, तर धर्मयुद्धाची रीत मोडूं न द्यावी, व ती मोडल्यास एकदम भांडण बंद करावें, व सर्वदा न्यायाचा पक्ष धरून जुलूम आणि उन्मत्तपणा, चालूं न द्यावा; हें त्यांचें काम होतें.

या प्रकारची सत्ता जी त्यांचे हातीं दिली होती, तिचा बहुत करून ते सदसद्विचारानें, शाळेच्या प्रसिद्ध हिताकडे, उपयोग करीत असत. लहानसहान कज्जे खोकले मिटवून टाकीत ह्मणून बरें, नपेक्षां त्यांच तंट्यांपासून अनर्थ उडून नाका डोळ्यास नुकसानी झाल्या शिवाय राहिली नसती; बहुतेक वेळां असें झालें आहे कीं, दोघे लहान मुलगे आपापले मित्र घेऊन

*लुई—फ्रान्स देशाचा राजा, उइल्यम—प्रशियाचा राजा, आलेक्—रुशियाचा राजा, योसफ—ऑस्त्रियाचा राजा आणि ड्यॉन्—अशी संज्ञा इंग्लिशास आहे.

पटांगणाच्या एका कोपऱ्यास कांहीं कारणावांचून उगीच मारामारी करायास गेले असतां, पट्टशिष्य लुई किंवा ज्यॉन् हे आलेले पाहून धाकानें त्यांस ती लढाई सोडून, पळून जावें लागे, किंवा एकमेकाशीं सख्य करून जाणें प्राप्त होई. एवढेंच त्यामध्यें वाईट होतें कीं, कधीं कधीं पट्टशिष्यांमध्येंच धमकाधमकी होत असे, आणि तेणेंकरून बाकीच्या पट्टशिष्यांस त्यांत हात घालणें फारच अगत्याचें होई. ह्या शाळेंत पूर्वींच्या एका भयावह मारामारिची अशी कथा चालत आली होती कीं, पूर्वीं * **निकलस्** या नावाच्या एका पट्टशिष्यानें गरीब बापड्या हेंदऱ्या † **इस्तंबूल** नावांच्या एका मुलावर, हल्ला केला होता. त्या वेळीं **ज्यॉन** व लुई यांहीं त्या लहान मुलास मोठ्या धैर्यानें संभाळिलें, आणि **निकलस्** याची अशी बळकट पूजा केली कीं, त्या दिवसा पासून त्याणें अगदीं मान वर केली नाहीं, व नंतर थोड्याच दिवसानी तो शाळा सोडून निघून गेला.

युरोपा काकूच्या शाळेंतलि वरच्या वरच्या वर्गांतल्या प्रत्येक मुलाच्या स्वाधीन केलेला, खेळायाच्या

* रशियाचा मयत राजा. † युरोपांतील तुर्क देशाचा राजा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

पटांगणाच्या एका कोपऱ्यास, लहानसा एकेक बाग होता. ते मुलगे आपापल्या बागेची [illegible] काळजी बाळगीत, व ते फारच नीटनेटके [illegible]. कित्येक बागांमध्यें फुलझाडें व फळझाडें लाविलीं होतीं, व कित्येकांत मोहरी, अहाळींव, किंवा मुळे इत्यादि भाज्या उत्पन्न करून, ते एकमेकांस विकीत असत; आणि खाण्यापिण्याच्या वेळीं तोंडीं लावण्याकरितां ह्मणून ते दिवाणखान्यांत नेवून ठेवीत असत. प्रत्येक बागाच्या मध्यभागीं त्या त्या धन्याच्या आवडी व शक्ती प्रमाणें एकेक मंडप बनावलेला होता. सर्वांपेक्षां लुईचा मंडप फारच सुशोभित होता, व तो केवळ इंद्रलोकींच्या नंदनवनासारखा रमणीय असून, अति सुंदर फुलझाडांनीं व हिरव्या गार रोप्यांनीं व्यापून टाकिला असे. त्याच्या छपरावर वेली चढविल्या असत, आणि आंतल्या बाजुनें एक लहानसा कारंजा उडत ठेविला असे. ज्यॉनचा बाग सुंदरच होता व त्याचें उत्पन्न इतर बागांच्या उत्पन्नापेक्षां जास्त असे; तो बाग केवळ द्वीपासारखा होता, व त्या सभोंवतीं पंचवीस हात रुंद अशा एका ओढ्याचा वेढा असल्यामुळें, सर्व बागांपासून तो अगदीं भिन्न होता; व हेंच

त्याच्या सौंदर्यास मुख्य कारण झालें होतें. परंतु त्याचा मंडप केवळ एक कारखाना दिसे, व त्यांत तो आपली खेळायाची सर्व वेळ, चरक फिरविण्यांत, जाळें विणण्यांत, सुऱ्या पाजळण्यांत व त्या ओढ्यांतून जाण्यायेण्याकरितां नावा तयार करण्यांत, घालवी. तथापि कधीं कधीं त्याला सुटी आवडत असे. आणि बागांतील मेहनती मुळें तो जेव्हां फार थकून जाई, तेव्हां त्या लहान प्रवाहाच्या पलिकडे जाऊन आपला शेजारी जो लुई त्याची भेट घेई. लुई हा नेहमिचा मौजी गडी असे, व आदर सत्कारांत दक्ष असून याच्या भेटीचा त्याला आनंद वाटत असे. पुष्कळ वेळां याणें आपल्या मित्राच्या मंडपांत, गालिचेदार नरम हरळीवर पडून, द्राक्षें खात असावें व निंबाचें सरबत प्यावें. तेथें बसला असतां तो मनांत ह्मणे कीं, माझें तें उबावलेलें केनसट वासाचें कसचें दुकान! त्यांत केरकचरा पडलेलाच असून, डामराची, जाळ्यांची आणि सळ्याची घाण, नेहमी येत असते; त्यापेक्षां हें स्थान किती बरें आनंदकारक आहे! पुनः मनांत ह्मणत असे कीं, कसेंही असो, इतर सर्वांहून माझ्या बागा पासून मी जास्ती कमाई

करीत आहे, त्या पक्षीं थोडीशी घाणही सोसली पाहिजे. असें ह्मणण्याचें कारण आणखी असें झालें कीं, मुलांना परिश्रम करण्याची सवई लागावी ह्मणून, उत्तेजन पूर्वक युरोपा काकूनें त्यांना बराच मोठा व्यापार करण्याची परवानगी दिली होती; आणि लोक असें ह्मणत कीं, 'ज्यॉन बोवानें अलिकडेस फारच मेहनत घेऊन कित्येक वेळां आपल्या कारखान्याची आणि बागाची सामाही प्राप्ती नेहमी पेक्षां तिप्पट चौपट वाढविली आहे.'

लुईच्या बागाचे बाजूस उइल्यमाचा बाग होता; आणि उइल्यम् सर्व पट्टशिष्यांत मोठा असून शक्तिमानही होता. आपण विद्याभ्यासांत गर्क असून फारच शांत मुलगा आहें, असा त्यागें डौल घातला होता, आणि आजन्मांत कधीं आपण तंटा उपस्थित केला नाहीं, असा ग्रह शाळेंतील मुलांच्या मनाचा करून दिला होता. ईश्वर प्रार्थनेचें गीत गाणें त्यास आवडत असे, व जिकडे जाई तिकडे आपल्या खिश्यांतून हमेश तो धर्मपुस्तक नेई; तथापि बहुतेक मुलांस उइल्यम् बोवा बरेच भोंदु आहेत असें निचुक वाटलें होतें. दुसऱ्यां मुलां प्रमाणेंच तोही आपल्या बागा-

चा अभिमानी होता, परंतु फुलझाडांचे दुसरे दोन लहान पाटे, जे त्यावेळीं लुईच्या ताब्यांत होते, ते हक्कानें ह्मटलें ह्मणजे, आपले आहेत असें त्यास वाटे, ह्मणून मत्सरी दृष्टीनें त्या पाट्यांकडे पाहिल्यावांचून त्याणें कधींही आपल्या बागांत काम करायास जाऊं नये. याशिवाय ही एक गोष्ट जगजाहीर होती कीं, लुईच्या बागाच्या पूर्वाधिकाऱ्यांपैकीं एकानें शिवेच्या कित्येक मेढी उपटून टाकून, आपल्या शेजाऱ्याची कांहीं जागा अपहारिली होती. ती परत संपादन करून घेण्याचा उइल्यमाचा पुष्कळ दिवसांपासून इरादा होता; परंतु त्याणें ही आपली इच्छा कोणास कळूं दिली नाहीं, आणि जी जागा ह्मणजे दुसऱ्याचा माल आहे, असें त्यावेळीं शाळेंतील सर्व मुलगे मानीत असत, तिचा अभिलाष करण्याच्या अपराधांत याचे सारखा चांगला व धार्मिक मुलगा पडेल, अशी कोणासच शंका आली नाहीं. फक्त आपल्या एका आवडत्या पोऱ्या पाशीं मात्र या प्रकरणी उइल्यमानें आपलें मन उघडें केलें; तो मुलगा धूर्त व शहाणा असे, आणि त्याचें नांव * मार्क होतें, जें कांहीं काम

* प्रशियाच्या राजाचा मुख्य प्रधान, बिस्मार्क.

तो करी, तें तो निर्धास्तपणें करीत असे, त्याचें सर्व हृदय छक्यापंजानीं व काविब्राजीनें भरून गेलें होतें, व तो इतका हिकमती असे कीं, जरी त्या म्हातारे बाईचे डोळे ससाण्याच्या डोळ्यां सारखे तीक्ष्ण असत, तरी तिला देखील तो केवळ एकादी मिखालस अन्यायाची गोष्ट करतांना सांपडला नव्हता.

मला सांगायास वाईट वाटतें कीं, जरी दारू पीणें व तंबाकू ओढणें, हें शाळेच्या नियमा विरुद्ध होतें, तरी ते उभयतां खेळायाची सगळी वेळ ह्या कामांत घालवीत असत. एके दिवशीं ते दोघे तंबाकू ओढीत व दारू पीत बंगल्यांत बसले होते, त्या समयीं उइल्यमानें त्या धूर्त तरूण मुलग्यास आपली इच्छा सांगितली; तेव्हां मार्क म्हणाला, "तें सिद्धीस नेण्याला एकच उपाय आहे, जर तुला ते फुलझाडांचे पाटे पाहिजे असले, तर त्यांसाठीं तूं लुईशीं लढाई केली पाहिजे; मला वाटतें कीं, तूं त्यास जर्जर करून टाकशील; परंतु एवढें मात्र आहे कीं, तूं त्या एकट्याशींच टक्कर मारली पाहिजे."

उइल्यम् म्हणाला "कसें, कसें म्हणतोस ?"

"म्हणजे दुसरे शिष्य या तंट्यांत पडूं नयेत म्हणून

मात्र तुला हुशारी ठेवावी लागेल. आणि ते जर या मारामारींत पडले तर खचितच वाईट होईल. मागें **योसफास** तूं मार दिलास त्या विषयीं त्याच्या मनांत खार आहे, त्याची आठवण ठेव, आणि त्या मोठ्या धमकाधमकीच्या दंग्यामध्यें **आलेकाशीं** विरोध धरून, **लुईनें** छोट्या **इस्तंबुलाची** तरफदारी केली, ही खरी, पण आतां शाळेत तुझें वजन पडत चाललेलें पाहून, त्या **आलेकाचें** पोट दुखत असतें, हें सर्वांनां ठाऊक आहे. पहातोस ना, अलिकडेस बोवा तूं फारच वाढला आहेस, आणि अतिशयच फुगलाही आहेस, व तेणे करून तुला शक्तीही फार आली आहे. हें कशाला, तूं एवढालासा कारट्या होतास त्याची मला आठवण आहे!

उइल्यम् मोठ्या भक्तीनें डोळे आकाशाकडे लावून ह्मणाला, "होय, माझी शक्ती वाढावी असें ईश्वराच्याच मनांत आलें आहे."

"परंतु तें दुसऱ्या पट्टशिष्यांस आवडलें नाहीं, हें मी उघड सांगतों, आणि जेव्हां तूं लहान मुलांचे बगीचे घेऊन आपल्या बागास मिळवून टाकलेस, तेव्हां त्यांना फारच राग आला होता, हें तुला ठाऊकच आहे."

 सं.का. ८०४

"होय, गड्या मार्का, परंतु तें मी केवळ तुझ्याच मसलतीनें केलें."

"खरेंच तूं केलेंस, व तें बराबरच केलेंस. तीं गरीबडीं काम करायास शक्तिमान नव्हतीं, ह्मणून त्यां त्यांच्या बगीच्यांची देखरेख करून त्यांस उत्पन्नाचा हिस्सा द्यावा हेंच सर्वोत्कृष्ट. हें बराबरच झालें, परंतु यामुळें सर्व पट्टशिष्यांच्या मनांत मत्सर उत्पन्न झाला आहे, यांत संशय नाहीं; किंबहुना त्या ह्मातारे बाईसही तें रास्त वाटलें असेल असें देखील माझ्यानें ह्मणवत नाहीं."

उईल्यम् हळूच डावा डोळा मोडून, बेटाकडेस बोटानें खूण करून ह्मणाला. "मार्का त्याविषयीं याला कसें काय वाटलें, त्याचा कधीं तरी तूं शोध लावला होतास काय ?"

मार्क तिटकाऱ्यानें हंसून ह्मणाला. "अं: ! त्याचे विषयीं तूं चिंता करूं नकोस. तो कोणाच्या तंट्यांत पडणारा नाहीं. तो आपला त्या हेंदऱ्या घाणेरड्या दुकानांत बसून, इतर मुलांनां विकण्यासाठीं, जिनसा तयार करण्याच्या कामांत, गढून गेला आहे. व: ! त्या दुकानाच्या घाणीची आठवण पडली ह्मणजे

मला ओकूं येतें !" असें बोलून त्या मिजाजी मुलं-ग्यानें आणखी कांहीं आवडते विचार मनांत यावे ह्मणून, दुसरा एक दारूचा प्याला झोंकला.

कांहीं वेळ उगीच तंबाकू ओढीत बसल्या नंतर, **उइल्यम** ह्मणाला. "तो फारच हिंमतदार आहे आणि सिंहासारखा बलिष्ट आहे."

" गड्या, तुझ्या ह्मणण्याप्रमाणें तो मोठा हिंमतदार आहे व बलिष्टही आहे खरा, पण आळशी किती ह्मणशील तर * * * * " असें ह्मणून उपमा देण्याला कांहीं मिळत नसल्यामुळें, दारूच्या प्याल्याच्या तळास तरी एकादें कांहीं मिळेल, ह्मणून **मार्कानें** तो उचलून तोंडास लावला, व तहान भागवून पुन: ह्मणाला कीं, "याशिवाय, आणखी तो कधीं तयारींत नसतो. पहा, त्याशीं व **निकलसाशीं** जी गोष्ट बितली होती, तींत त्याणें आपले कसे पुरे हालकरून घेतले होते ते, ती गोष्ट तूं शाळेंत यायच्या अगोदर झाली होती बरें काय, परंतु मला त्याची पक्की आठवण आहे. हें तर काय! त्या गरीब **ज्योनीच्या** पायांत, त्या लढाईचेवेळीं पुरते जोडेही नव्हते, आणि त्यांत आणखी त्या पटांगणामध्यें जिकडे पक्कळ दगड

आहेत तिकडेसच ती लढाई झाली. तेणेंकरून त्याचे पाय फाटून चिंध्या चिंध्या उडाल्या. एवढेंही असून त्याणें तें सर्व अगदीं थंडाईवर टाकलें, यामुळें सकाळीं त्याची न्याहरीची वेळ चुकून गेली, आणि मग त्याला उपाशीं पोटावर लढणें प्राप्त झालें. हिंमत आणि बळ असणें हें फारच चांगलें खरें; परंतु खायाला प्यायाला असून, आणखी पायांत घालण्याला एक चांगला जोडाहि असला पाहिजे.

उइल्यम् ह्मणाला, "त्याचे जवळ तर द्रव्याच्या राशी पडल्या आहेत; त्याच्यानें कां बरें एक चांगला-सा जोडाही घेववला नाहीं ?"

"राशीच्या राशी आहेत खऱ्या, परंतु त्या त्याला दुसऱ्या कामास पाहिजेत.—मला वाटतें कीं, एकादा नवा चरक विकत घेण्याकरितां ठेविल्या असाव्या; आणि त्याप्रमाणें तो आपल्या घाणेरड्या दुकानांत चरक फिरवीत बसलाही आहे, व पावल्या चवल्याची किफायत कशी काय करावी याचा विचार करीत आहे."

"तर गड्या मार्का आतां काय करायाची तूं मला मसलत देतोस ?"

"मसलत द्यायाचें काम कांहीं सोपें नाहीं. त्याला

कांहीं अवकाश पाहिजे, एकादा विचार माझ्या मनांत आला ह्मणजे मी तुला तो कळवीन. एवढेंचमात्र कर कीं, जें कांहीं तूं करशील त्यांत लुई बोवाचा अन्याय दिसावा असें करण्यांत दक्षता ठेव. तूं होऊन त्याचे जवळ तंट्याचें मूळ काढूं नको. परंतु आंतून असी युक्ती लढीव कीं, त्याणें होऊन तुजजवळ मारामारीस यावें. जनांत असें दाखीव कीं, अजूनही शांतता असावी असी माझी इच्छा आहे, व नित्य नेमा प्रमाणें आपलें धर्म पुस्तक काखेमध्यें घेऊन फिरत जा, ह्मणजे **युरोपा** काकू तुजकडेस फारसें लक्ष देणार नाहीं, आणि पूर्वीं प्रमाणेंच तिचा तुजवर विश्वास राहील. बाकीचें सर्व मजकडे लागलें, परंतु तूं मात्र आपल्या तयारींत ऐस; आणि शहरांत कोणी कुस्तीची तालीम देत असतो असें जर तुझ्या कानावर आलें, तर त्याचे जवळ जाऊन कांहीं डाव पेंच शिकून ठेव. मला असी पक्की बातमी लागली आहे कीं, **यासफास** तूं जबरदस्त मार दिल्यापासून लुई फार मेहनतीनें तयारी करीत आहे, व कसरतही करीत आहे."

इतक्यांत दुपारची शाळा भरण्याची घंटा वाजली,

तेव्हां त्या उभय मित्रांनी घाईघाईने तंबाकूच्या विड्या विझवून, बाकी राहिलेली दारू पार केली. **मार्क** पाण्याच्या बंबाजवळ हात धुवायला धांवला, आणि त्याणें ते पुष्कळ चोळले घांसले तथापि नीट साफ झाले नाहींत; इकडे **उइल्यम्** आपला आंगरखा बदलून, पटांगणातून गंभीरपणानें चालला, व आपल्याशींच धर्मपुस्तकांतलें जुनें शंभरावें गीत सरासरी साधारण स्वराने गुणगुणावीत आला.

आपला कावा सिद्धीस नेण्याला त्यानां लवकरच एक संधी सांपडली. **लुईच्या** बागाच्या दुसऱ्या बाजूस एक * बाग रिकामा पडला; व तो स्वीकारण्यास कोणी फार उत्सुक होता असें दिसून आलें नाहीं. ती फार कटकटीची जागा होती, व शहरच्या लुटारू लोकांपासून नेहमी तिला हल्ल्याचें भय असे; ते लोक रात्रीचा छापा घालून, नवीन लावलेलीं फुलझाडें उपटून टाकीत असत. तशींच भांडखोर मांजरें देखलि शिकारीसाठीं तेथें इकडून तिकडे उड्या मारून, फुलझाडाच्या पाल्यांचा विध्वंस करून टाकीत, याकरितां त्या साठीं कोणी पुढें होईना, असें झाल्यामुळें

* स्पेन देश.

तो बाग धन्यासाठीं जिकडे तिकडे भिक्षा मागत आहे असें दिसूं लागलें.

एकेदिवशीं **मार्क** आपल्या पोशिंद्या मित्रास ह्मणाला, "तुझा धाकटा चुलत भाऊ आहे, त्याला तो बाग, मला वाटतें, मिळेल हवा तर."

"त्याला तो हवा असला तर कां मिळूं नये?" असें **उइल्यमानें** उत्तर केलें, परंतु त्याच्या त्या विश्वासू पोऱ्यानें तें कोणत्या अर्थानें ह्मटलें, हें समजण्याजोगी त्याची बुद्धी खोल नव्हती.

"मग तर **लुईची** मौज होईल, समजलास काय तूं! एके बाजून त्याला तुझा दाब, आणि दुसरे कडून तुझ्या चुलत भावाचा पाहरा, असें होऊन जाईल," असें **मार्क** निष्कपटानें ह्मणाला.

"होयरे बाबा! खरें खरें" असें **उइल्यमानें** जागा झाल्यासारखें करून ह्मटलें.—"तसें होईल खरें; आणि होइलतर फार चांगलें होईल; **मार्का** तूं तरी एक धूर्त कुत्रा दिसतोसरे."

"मला वाटतें, लुई पाशीं हा शब्द काढून जर त्याची थोडीशी शोभा करशिल, तर ही लहानशीच कळ खरी पण, त्याला तिचा असा कांहीं चटका

लागून जाईल कीं,—काय सांगूं, मागाहून जरी तूं तो शब्द मागें घेतलास तरी लुई ह्मणून तो कधीं विसरणार नाहीं.

"खरोखर गड्या, आणि असें झालें ह्मणजे मग मारामारीचा प्रसंग यायचाच, पण पहा दुसरीं पोरें तर ह्मणणार नाहींत नां कीं मी होऊन हा कज्जा उपस्थित केला ह्मणून."

"नाहीं, जर आह्मीं युक्तीनें काम केलें तर तसें होणार नाहीं. कज्जाचें मूळ तुजवर येण्याबद्दल, तें लुईच्या डोक्यावर ते घालतील. तूं तसाच अगदीं शांत मुलगा आहेस, ऐकलेंस काय; आणि पूर्वीं पासून तंटेबाज कायतो तो." असें उत्तर दिलें.

या प्रमाणें ठरल्यावर, उइल्यमाच्या धाकट्या चुलत भावाला तो रिकामा झालेला बाग मिळावा ह्मणून युरोपा बाई जवळ अर्ज आला. तेव्हां ती ह्मणाली, "बरें आहे, परंतु लुई त्याचा शिमशेजारी होईल या करितां त्याला जर कांहीं या पासून अडचण नसली तर तो त्यास मिळेल."

लुई ह्मणाला काळू साहेब, या पासून मला मोठी अचडण आहे; मी यास अगदीं नाकबूल आहे. उइ-

ल्यमानें आणि त्याच्या चुलत भावानें मिळून मला चोंहींकडून कोंडून टाकावें, अशी माझी इच्छा नाहीं. ते एकमेकांस भेटण्याकरतां माझ्या बागांतून जाणार येणार, व कदाचित माझ्या पटांगणामधून एकमेकांकडेस चेंडू फेंकणार."

"अंह! परंतु कोणतेंच अयोग्य काम मी करीत नाहीं, हें आपल्यास पक्कें माहीत असेलच, मी कधीं कोणावर हल्ला केलेला नाहीं." असें उइल्यमानें कुचेष्टेनें ह्मटलें, आणि धर्मपुस्तकासाठीं ह्मणून तो आपला खिसा चांचपूं लागला, तों पुस्तकाच्या बदली तंबाकूची पिशवी आणि ब्रांडीची कुपी चुकून बाहेर आली; परंतु दैववशात् काकू बाईची नजर त्यावर पडायाच्या पूर्वी लवकर लवकर त्याणें ती खिशांत परत घातली.

"हं! मी सगळें पाहिलें! तुझी भक्ति मी खरी मानीत नाहीं. निघ, आपल्या त्या प्रीतिंतल्या आप्ताला घेऊन येथून चालता हो; आणि त्या दिवशीं त्या बिचाऱ्या *क्रिस्तांवापासून अडचणींतले कोन कोपरे घऱ्यांत उतरविले आहेस त्या पैकीं एकादा त्यास दे; चल."

* डेन्मार्कच्या राजा पासून.

उइल्यम् अगदीं दिनवाणी मुद्रा धरून ह्मणाला. "लुई मी कोणाचें कांहीं घश्यांत उतरलें नाहीं, हें तुला ठाऊक आहे. मी परस्परांमध्यें मैत्री इच्छिणारा मुलगा आहें * * * *"

लुई नाक मुरडून ह्मणाला, "होय अगदीं तसाच आहेस खरा ! *'ब्रमाजमच्या मला जवळ' आज सहा सात महिन्या पासून जी तालीम घेत आहेस ती, मला वाटतें, मैत्री राखण्या करतांच असावी;—तो माझ्या एका मित्राजवळ फुशारकी सांगत होता, कीं, जरी तुजसारखा अनाडी त्याणें आपल्या जन्मांत दुसरा कोणी पाहिला नव्हता, तरी त्याणें, ह्मणें, तुला बुक्यांच्या मारामध्यें अगदीं हुशार आणि तलवारेच्या धारे सारखा तीक्ष्ण करून ठेवला आहे."

" 'माझ्या एका मित्राजवळ' असें, तूं ह्मटलेंस, होय ना गड्या ? तर तो कदाचित †'शेफिल्डचा वस्तादजी' असेल, त्याणें माझा पोऱ्या मार्क यास सांगितलें कीं, तुझे दंड त्याणें दोनशें हातांवर चेंडू किंवा दगड फेंकण्याजोगे बळकट केले आहेत, ह्मणून."

---

* फॉन् मॉल्टकी, प्रशियन् राजाचा सेनापती.

† ल बफ, फ्रान्स देशाचा (युद्धसंबंधीं) प्रधान.

हें ऐकून ती म्हातारी बाई म्हणाली, "चला चला, असे इकडे या, माझ्यानें हें तापट भाषण ऐकवत नाहीं. तुम्हीं पांचही पट्टशिष्य मिळून हा तंटा मुक्यान्यांनीं आपसांत मिटविला पाहिजे; पण मारामारी करूं नका, खबरदार. मारामारीचे दिवस आतां गेले." असें बोलून ती बाई त्यांस सोडून निघून गेली.

"* विल, मी जर तुझ्या जागीं असतों, तर या विषयीं आग्रह धरिला नसता; हें केवळ लुईला संतापकारक आहे, असें मला वाटतें." असें ज्योन आपल्या दुकानाच्या खिडकींतून पाण्याच्या पलिकडल्या तिराकडेस पाहून, घोगऱ्या कंठानें म्हणाला.

"जे तूं सांगशील तें ऐकण्यास मी हमेश तयार आहें." असें उइल्यमानें म्हटलें व त्या बागा विषयींची नव्या मुलाची मागणी रद्द केली.

उइल्यम् आपल्या मित्राकडे पाहून म्हणाला "पुढें कसें करावें बरें मार्का? या खटपटिचा निकाल झाला असें दिसतें."

"कांहीं निकाल होत नाहीं, लुई संतापून आस्वलासारखा होऊन गेला आहे; तो लागलाच तुटून पडेल,

---

* उइल्यमाचें लाडकें नांव.

संग्रहाल... पुणे.

पडतों कीं नाहीं पहा हवा तर." असें त्याणें जवा-व केला.

लुईला शेवटीं अनिवार क्रोध येऊन, तो ह्मणाला, "माझी त्याणें फारच निर्भत्सना केली आहे, यासाठीं मजवर वरचड करण्याकरितां असे लपंडावी उद्योग पुनः कधीं करणार नाहीं, असें त्याणें वचन दिल्याशिवाय, माझी खातरी व्हायाची नाहीं."

"जीव दे ह्मणावें त्याला." असें मार्कानें उइल्यमा पाशीं फुसफुसून ह्मटलें.

"तूं जीव—" असें उइल्यमानें ह्मटलें, पण इतक्यांत त्याला आठवण पडून तो ह्मणाला, "नाहीं, नाहीं, माझ्या तोंडांतून अवाक्षर यायचें नाहीं. माझ्या मित्रा, माझ्यानें ह्या प्रकारचें वचन देववत नाहीं."

"बरें बरें, स्तोत्रपाठी भोंदूबोवा, तुला झोडून तुजकडून वचन घेतों कीं नाहीं पहा." असें लुईनें तिटकारून ह्मटलें.

"ये, निघ." असें ह्मणून उइल्यमानें हात वर उचलले आणि जणूं कांहीं भक्तिपूर्वक डोळे आकाशाकडे लावून देवापाशीं, आपल्या कार्याचें गाऱ्हाणें सांगत आहे, असें करून दाखविलें. पण लुईनें,

त्यास त्याच्या शब्दाबरोबर जाऊन गांठलें नाहीं, हें त्याचें नशीबच समजायाचें, कारण त्याणें एक हात वर उचलला होता, व दुसऱ्या हातांत घरीं नेण्याकरितां धर्मपुस्तकांचें बोचकें घेतलें होतें, तेणेंकरून त्याला खालीं पाडायाला, एक पळ देखील लागलें नसतें. परंतु त्या दिवशीं लुई किंचित आळसावला होता, आणि त्याच सकाळीं त्याणें रेचक घेतलें होतें, ह्मणून तो एकाएकीं तुटून पडला नाहीं. आणि आपल्या प्रतिस्पर्ध्याची पुन: गांठ पडेल तेव्हां पाहूं, असें ह्मणून उगाच राहिला.

इतक्यांत **मार्काच्या** मसलतीवरून, उइल्यम् हा **ब्रमाजम्च्या मल्ला**जवळ धांवत गेला. तिकडे त्याणें त्यास नवीन डाव पेंच शिकवून शस्त्रविद्येंत असा निपूण केला कीं, दुसऱ्या दिवशीं प्रात:काळीं न्यहारी नंतर **लुईशीं** जी त्याची पहिली कुस्ती झाली, तींत त्याणें आपल्या सर्व शक्तीनें बळकट ठोसा मारून सपाट्या सरशीं शत्रूस उलथून पाडलें. लुई पुन: उठून उभा राहिला, आणि त्याचीही त्याणें बुक्याबुक्यानीं यथास्थित कुंदी काढली. तथापि तो बळानें कमी असल्यामुळें, पहिल्या हाताच्या शेवटास त्याला बरीच शिक्षा मिळाली.

लुईच्या कपाळाचा भडका होऊन घामाचे लोट चालले होते, ते तो पुशीत असतां, त्याचा चडफडाट व्हावा ह्मणून, उइल्यम् त्यास ह्मणतो:— "कसें काय भारीच जबर काम, नाहीं गड्या? * आगीचा बाप्तिस्मा तूं ज्यास ह्मणतोस तो हाच असावा, असें मला वाटतें. अं!" नंतर त्याणें आपल्या आईस एक अर्ध आण्याच्या उघड्या टपालखरड्यावर पत्र लिहिलें, याचें कारण असें कीं, आपण किती धार्मिक आहें हें टपालाचीं पत्रें वांटणाऱ्यांस देखील समजावें, हा त्याचा हेतु होता. तें पत्र असें होतें:— "जिवलगे आई, मी माझे पितृभूमीसाठीं भांडत आहें. माझ्या वागास मी पितृभूमी असी संज्ञा दिली आहे, हें तुला ठाऊकच आहे. हें फारच चांगलें नाव होय. यापासून लोकांच्या अंत:करणांत कनवाळूपणा येत असतो. विजयाची बातमी! ईश्वर कृपेनें मी लुईचा डोळा सुजविला. त्याला जें दु:ख झालें असेल त्याची तुला

* युद्धाच्या आरंभीं लुईनें प्राशियन् लोकांचें एक गांव जाळलें, त्या वेळीं त्याचा मुलगा त्याचे बरोबर होता; त्या युद्धप्रसंगीं शत्रूकडील तोफांचे गोळे त्यांचे नजीक येऊन पडत असत, तेणे करून आपल्या मुलास, 'आगीचा बाप्तिस्मा' झाला, असें त्याणें आपले बायकोस लिहून पाठविलें होतें.

कल्पना करितां येईलच. काय चमत्कारिक गोष्ट ईश्वरानें बनवून आणिली पण! तुझा जिवलग मुलगा उइल्यम्." मग त्याणें एक गीत ह्मटलें, आणि दुसरा एक हात करायाला गेला.

तों पर्यंत इतर पट्टशिष्यांनां आतां काय करावें, हें बरोबर सुचत नसल्यामुळें, ते स्तब्ध उभेराहून पहात होते.

"आपण आतां आंत पडावें नाहींबरें?" असें **ज्यॉनने** आपल्या प्रीतींतल्या एका पोऱ्यास विचारलें.

* **बिल्ली** ह्मणून **ज्यॉनचा** मुख्य पोऱ्या होता, त्याणें त्याचें बोट घट्ट आवळून धरलें, आणि ह्मटलें, "छे छे, जिकडचा तिकडे गुपचुप बैस. उगीच सगळा घोटाळा मात्र करून टाकशील, आणि उभयतानांही राग आणशील. आपण आपले तिऱ्हाइत आहों, असें लोकांत फैलाव ह्मणजे झालें."

ज्यॉन गुरगुरून ह्मणाला, "तिऱ्हाइत; धिःकार असो त्या तिऱ्हाइतांनां. दोघे संवगडी विनाकारण आपआपसांत भांडण करून एकमेकांचीं डोचकीं फोडून आणि हाडांचे तुकडे करून घेतात, असें असतां आ-

* उइल्यम् ग्याड्स्टन्, इंग्लंडच्या राणीचा मुख्य प्रधान.

र्‍हीं थंड बसून तें पहावें, हीं अगदीं वेडपणाची गोष्ट, त्या दोघांची ही चूक आहे. त्यांणीं भांडण करणें बरोबर नाहीं. जाऊंदे मला त्यांजवळ."

" नकोरे बाबा नको," असें * बाबी या नावाचा एक हुशार व सुंदर केशांचा मुलगा जो ज्यॉनचा हिशेब व पैसा ठेवीत असे तो ह्मणाला;—" तुझा तेथें निभाव लागणार नाहीं, आणि या शिवाय त्यांत- जाऊन पडायाला तुझ्या आंगावर पाहिजेत तसे कप- डेही नाहींत. या शाळेंत असा कोणी एकही मुलगा नाहीं कीं, जर तुं योग्य वस्त्रां वांचून त्याच्या बागांत उभा राहिलास तर तो ह्मणजे तुला हंसायाचा नाहीं; उगीच बैस, आणि गड्या आपलें चरक फिरवून कांहीं जास्ती पैसे गोळा कर; आणि आपण बेटांत राहतों ह्मणून आपल्यास कोणाचें भय नाहीं, याकरि- तां ईश्वराचे उपकार मान."

ज्यॉन गाल फुगवून ह्मणाला, "बरें, जरी माझे कपडे खरेच फारसे बरे नाहींत, व ते नीट करायास वेळाही राहिली नाहीं, तरी तूं सांगितलेंस हें केवळ मला आवडलें असें नाहीं; परंतु इकडे पहा **बाबी**,

---

* इंग्लंड देशाचा खजीनदार.

त्या दरिद्र्यांनी एकमेकांस ठेचून रक्तप्रळय जर केला, तर त्यांस धुवून पुसून साफ वगैरे करण्याची मदत देण्यासाठीं तरी आपण तेथें जावें ह्मणतों."

"पाहिजे असल्यास तसें कर." असें बाबी ह्मणाला,— "त्यांत आपण कोणाशींच शत्रुत्व केलें नाहीं असें होईल. व त्यांत मलमपट्यांसाठीं आणि लेपासाठीं एकादा बारा आण्याचा खर्च लागेल तेवढाच. परंतु, ज्यॉनी तुझें ईश्वर कल्याण करो, जर करतां लुईशीं किंवा उइल्यमाशीं टिकाव काढण्याकरितां सज्ज होणें असलें, तर शंभरांवर रुपये बाहेर काढावे लागतील संभाळ."

ज्यॉन कुरमुरत आपल्या कामास लागला; कारण कीं, शाळेत त्याला नेहमीं मुख्य पट्टशिष्य असें मानीत असत, आणि आतां त्याला दुय्यम पट्टशिष्याप्रमाणें वागावें लागेल, याकरितां त्याला तें आवडलें नाहीं. जसा तो मागें ठाकठिकया व तयार असे, त्याच्या अर्ध्यानें जरी तो यावेळीं असता तरी एका निमिष्यांत ही मारामारी त्याणें बंद करविली असती, असी त्याची पक्की खातरी होती. असें कशावरून ह्मणाल तर, घटका दोन घटकानीं बीली व बाबी व इतर

सर्व लहान लहान खुषामती, ज्याणी हांजी हांजी करून व द्रव्य गोळा करण्याची युक्ति शिकवून, त्याची कृपा संपादन केली होती, त्यांना तो शिव्या देऊं लागला. "आग लाव त्या पैशाला" असें त्याणें मनांतल्यामनांत गुरगुरून ह्मटलें. "जर माझी जुनी अब्रू मला परत मिळती, तर मी माझें अर्धोअर्ध दुकान दिलें असतें." परंतु असें ह्मणून काय उपयोग? ती वेळा गेली. तरी त्याणें आपल्या मर्जीप्रमाणें त्यानां धुवून साफसुफ करण्याची मदत देण्यांत आपलें काम चांगल्या रीतिनें बजावलें. प्रत्येक हल्ल्याचे अखेरीस, त्याणें ओढ्यापलिकडे जाऊन बिच्याऱ्या लुईच्या डोचक्यावर पाणी घालावें, कारण त्यास मदतीची फार गरज होती. आणि आपल्या कुपींतून त्याला दारू आणि पाणी पाजावें. तो मृतप्राय होऊन पडला असतांही, कुस्ती करण्यासाठीं, पुन: पुन: उठून उभा राहण्याचा प्रयत्न करीत असे, तें पाहून ड्यॉनानें त्याला ह्मणावें कीं, "गड्या लुई तुझें मला फार दु:ख वाटतें."

लुई अम्मळ तिटकाऱ्यानें त्या आपल्या मित्राकडे पाहिलेसें करून ह्मणाला "ड्यॉन् मजवर तुझे उप-

कार झाले, पण तूं आह्मांस कां बरें मोकळें करीत नाहींस ! ह्या दैत्यापुढें माझा टिकाव लागायाचा नाहीं, हें तुला समजत नाहीं काय ? तो याप्रमाणें लढेल असें मला वाटलें नव्हतें."

"मी काय करूं, तूं होऊन ही कळ काढलीस, वास्तव तूंच ती निस्तरली पाहिजे. मला कांहीं सामर्थ्य नाहीं." असें ज्यॉन् ह्मणाला.

लुई ह्मणाला, "असें दिसतें खरें. असो ती वेळा गेली * * * बरें, ज्यॉन् तूं * * मलमपट्या व लेप लावतोस याचे उपकार मी विसरणार नाहीं."

इतक्यांत "चल ये !" असें रक्तासाठीं तान्हेलेल्या उद्दल्यमानें ओरडून ह्मटलें.

"हर हर हर," असें ह्मणून लुई आंधळ्यासारखा शत्रुकडे धावला. मोठ्या शौर्यानें तो लढला, परंतु त्याच्यानें टिकाव काढवला नाहीं. जो जो ठोसा तो मारीत असे, त्या त्यामध्यें त्याचा कांहीं तरी हेतु असे, परंतु जिकडे पाहिजे तिकडे न लागल्यामुळें त्यापासून शत्रूची क्वचितच नासाडी होई. पाऊल म्हणतां म्हणतां हात हात तो मागें हटत चालला, आणि शेवटीं आश्रयासाठीं आपल्या मंडपांत शिरण्याचें त्यास

अगत्य पडलें. आणि तेथें गेल्यावर शत्रुनें आपला पाठलाग करूं नये म्हणून मंडपाच्या खिडक्यांतून तो त्यावर दगडांचा मार करूं लागला.

लुईनें चूक केली हें उघड आहे. त्याणें शत्रुच्या सामर्थ्याचा विचार केल्याशिवाय त्यावर हल्ला करायाचा नव्हता, आणि ज्या पक्षीं त्याणें यांत उतावळी केली, त्यापक्षीं त्यास हें शासन योग्यच. परंतु आतां त्यास शासन होऊन चुकलें, आणि जो उइल्यम् आपल्या शांत वृत्तिविषयीं एवढें सगळें बोलत असे, व फक्त आपले 'पितृभूमीचें' रक्षण करणें एवढाच आपला हेतू, असें म्हणत होता, त्याणें त्याच्या बागांत शिरून त्याचा पाठलाग केला, आणि शिमांचा व बागांतील पाच्यांचा तुडवून विध्वंस करून टाकला, आणि लुईचा सुंदर बंगला मी मोडून टाकीन व लुईला शरण आणीन अशी शपथ घेतली, त्यावेळीं इतर पट्टशिष्यांहीं मध्यें पडणें योग्य आहे असें सर्वांच्या मनांत आलें; परंतु एक पाऊल देखील त्यांहीं पुढें टाकिलें नाहीं. आलेक् हा, लांबून या उभयतांतून कोण पहिल्यानें थकतो हें साश्चर्य पहात होता. योसफ् हा एकादा बोल तोंडांतून काढला असतां, उइल्यम् आपल्यावर

उतरून पडून पुनः मार देईल, या भयानें कांपत उभा राहिला होता. आणि ज्यॉन् आपल्या दुकानांत सिंहासारखा काम करीत होता, आणि लुईची जर एकादी पाण्यांतून स्वारी करायाची मर्जी असली तर त्यास कदाचित् होडीची गरज लागेल म्हणून, त्याचे होडीसाठीं सुकाणें आणि वल्हीं बनावीत बसला होता, ह्या मेहनती बद्दल लुईकडून त्यास चांगलें मोल मिळालें, पण उइल्यमाकडून बेंबीच्या देंटापासून शिव्यागाळी खाव्या लागल्या.

तेव्हां क्षमा मागितल्यासारखें दाखवून ज्यान् ह्मणाला, "मी काय करूं, तुलाही सुकाण आणि वल्हीं तयार करून देईन, व त्याखेरीज पाहिजे असल्यास नावही बनावून देईन, — परंतु जर चांगली किंमत दिलीस तर."

" पण मला गरज नाहीं तुझ्या नावेची. नावेसाठीं नवी नदी उत्पन्न केली तर, ती मात्र माझ्या उपयोगी पडेल, हे तुला पक्कें माहीत आहे. " असें उईल्यम् रागावून ह्मणाला. यावरून सहज लक्षांत येईल कीं, " तिऱ्हाइतपणा " मुळें ज्यॉनानें पुष्कळ मित्र मिळविले असें कांहीं घडलें नाहीं. "आणि इकडे

पहा, ह्या माझ्या कपाळावर जखमा कशा झाल्या, हें तुला ठाऊक आहे काय ? कां, मला मारण्याकरितां ह्मणून ओढ्या पलीकडेस जे दगड तूं लुईपाशीं झुगारले होते, त्यांपासून ह्या झाल्या आहेत बरें काय ? असें उइल्यम् ह्मणाला.

"अरे बिल यांत माझा अपराध नाहीं; हा तिऱ्हाइतपणाचा धर्मच आहे."

"खरोखरीं तिऱ्हाइतपणा हा ! मी तर यास शुद्ध जनावरपणा म्हणतों." असें म्हणून त्यास आपल्या कामांत टाकून उइल्यम् चालता झाला.—तेव्हां आपल्या कृत्याविषयीं ज्योनाला मोठी लाज वाटूं लागली.

इतक्यांत "ज्योनी इकडे ये आपल्या मित्राला मदत कर." असें आपल्या मंडपांतून निराश होऊन लुईनें म्हटलें;— "तूं आपल्या दुकानास कंटाळून इकडे येत होतास, व त्यावेळीं जे आम्ही उभयतां आनंदात दिवस घालवीत होतों, त्याची आठवण कर म्हणून मी तुला सांगतों असें नाहीं, परंतु ज्या पक्षीं मी आतां निराश स्थितींत आलों आहें,आणि कोणीकडे जावें हें मला समजत नाहीं, त्यापक्षीं यावेळीं जें कांहीं तुझ्याहातून थोडें बहुत होण्याजोगें असेल तेवढें कर."

"मी फार खिन्न आहें लुई, परंतु काय करूं ?" असें ज्यॉन म्हणाला,—"तूं मार खावेस आणि ते मी पहावे, यांत कांहीं मला आनंद नाहीं. आपला सीम-शेजारी, दुःखी आणि जमीनदोस्त असावा, त्यापेक्षां तो जर सुखी आणि आनंदित असला, तर त्यामुळें मला उलटा फायदा आहे. तूं शरण कां बरें जात नाहींस लुई ! अशीच मारामारी चालवावी यांत कांहीं हांसील नाहीं. बागाच्या त्या दोन चिंधोट्या परत दिल्यास तर तो आतां तुझा मित्र होईल, आणि जर तूं त्या दिल्या नाहींस तर तो तुझ्या मंडपाचा नाश करील किंवा जेवायाचे वेळेवर तुला मंडपांत टाकून ठेवून उपाशीं मारील. हात जोड त्याला गड्या हात जोड. त्यांत कांहीं दुर्लौकिक नाहीं. तूं फार शौर्यानें लढ-लास असें सर्व लोक म्हणतात."

"शरण जा आणि हात जोड हँ !" असें लुई लावून बोलला, आणि म्हणाला, "एवढाच काय तो धीर तुजपासून तुझ्या सोबत्याला मिळायाचा कायरे ! शरण जा ! कां, जर तोच दैत्य तुझ्या दुकाना स-मोर येऊन उभा राहिला, आणि तुझें दुकान मोडून टाकीन असी त्याणें शपथ घेतली, तर तूं त्यास शरण

जाशिल काय ? यांत दुर्लौकिक नाहीं. खचीतच ! नाहीं खराच ! मी जें कांहीं केलें आहे त्यांत कांहीं दुर्लौकिक आहे असें मला वाटत नाहीं; परंतु जरी माझा फारच आवडता मंडप जो बांधण्यास मला पुष्कळ दिवस लागले, तोही माझ्या समक्ष मोडून टाकला, आणि माझ्या बागांतलि सर्व फुलझाडें उपटून टाकलीं, तरी ज्यॉना, तूं जो तिकडेस एवढा सुरक्षित बसला आहेस त्या तुशीं देखील माझे स्थितीची अदलाबदली करायास मी खुशी नाहीं. नाहींच नाहीं, पृथ्वी वरील सर्व द्रव्य जरी मला दिलें तरी नाहीं, मी तसें करायाला खुशी नाहीं. हात जोड हें ! हे जगन्निवास ! ह्या आमच्या ओढ्या पलीकडून आलेल्या शब्दांसारखे शब्द कधीं तरी माझ्या कानीं पडावे काय ?"

यावरून ज्यॉनाला असें समजूं लागलें कीं, जरीं तमाशा पहाणारे सगळा तमाशा पहातात, तरीं त्यांस त्यापासून ह्मणजे नेहमी मौजच प्राप्त होत असती, असें नाहीं. परंतु इतक्यांत जेवणाची घंटा वाजली, व आतां युरोपा बाईला झालेलें वर्त्तमान सांगावें लागेल, ह्मणून तो मनांत चिंताग्रस्त होऊन, सर्व मुलांच्या पाठी मागून जाऊं लागला.

"लुई आणि उइल्यम् यांस आज फार उशीर झाला. ते कोठें आहेत, कोणाला ठाऊक आहे काय रे?" असें अर्ध्या जेवणावर काकू बाई ह्मणाली; तेव्हां जीं मुलें तिच्या जवळ बसलीं होतीं, त्यांकडून हळू हळू सर्व वर्तमान तिला समजलें.

"आणि ज्यॉन् तूं कां बरें त्यांस सोडविलें नाहीस तें मला सांगशील?" असें त्या बाईनें त्यास धमकावून विचारलें.

"काकू साहेब, मी तिन्हाइत झालों होतों," असें ज्यॉननें उत्तर दिलें.

"काय झालां होतां राव?" ह्मणून तिणें विचारलें.

"तिन्हाइत काकू साहेब."

"ह्मणजे जें कांहीं तुझ्या हातून होऊं नये, तेंच तूं केलेंस एकून." असें ती ह्मणाली,— "तुला अधिकार कशासाठीं दिला होता? तूं तो चालवावा ह्मणून ना? लांब उभा राहून पहावें म्हणून दिला नव्हता. तसें असतें तर एकाद्या लहान्या मुलानें देखील तें केलें असतें. पट्टशिष्यानीं म्हणजे उगीच बसावें असें जर माझ्या मनांत असतें, तर मी या धाक-

न्या † ज्यार्जीला पट्टशिष्य बनविला असता. तिन्हाइत खरा! तिन्हाइत हें नाव क्लीवाला मात्र शोभतें, याशिवाय दुसरा कांहींच त्यांत अर्थ नाहीं. तुझ्या मर्जीस येईल त्याप्रमाणें मग तूं कर, पण तुला ही किंवा ती बाजू स्वीकारलीच पाहिजे. आतां तूं कोठचा पक्ष स्वीकारला ह्मणतोस हें पाहूं?"

हें ऐकून सगळीं मुलें खिद खिद हसूं लागलीं, आणि त्यांनां ती एक मोठी गंमत झाल्यामुळें तीं एकमेकांच्या कानाशीं खुजबुजूं लागलीं. आणि याबद्दल मागाहून त्यानां (ज्यॉन) पट्टशिष्या कडून एकादा छडीचा मार मिळेल असें जरी माहित होतें, तरी सध्यां त्याची खरडपट्टी काढलेली पाहून त्यांनां ती मोठी मौजच झाली.

"तूं काय ह्मणतोस? दोनही पक्ष धरले ह्मणतोस हं! बरें ज्यान् साहेब, हें आपणास कसें बरें साधलें?" असें ती बाई ह्मणाली.

कांहीं वेळ पर्यंत, खिद खिद, खुजबूज आणि गोंधळ झाल्या नंतर, एकदांच कांहीं मुलें ह्मणालीं,

† ग्रीसचा राजा.

" काकू साहेब, तेणेकरून. त्याणें दोघांच्याही डोळ्यांस पाणी लाविलें."

" तिऱ्हाइताचें हेंच काम, उभयतांच्या डोळ्यांस पाणी लावावें आणि कोणासच खुषी करूं नये." नंतर हळूहळू दुसरें कांहीं अधिक वर्त्तमान ऐकून घेउन ती ह्मणाली, "हं! यांत कांहीं संशय नाहीं, लुईला नेहमी सांगायाचें कीं, 'हा तुझा अपराध,' असें करून त्याची मर्जी तोडली. आणि उइल्यमाची मर्जी लुईला दगड पुरवून तोडून टाकली. आतां खरी गोष्ट काय आहे ती मी तुला सांगतें ज्योन, पुष्कळ दिवसां पासून तुझी वर्त्तणूक पाहून मला फार खेद वाटत आहे. तूं कांहीं किरकोळ पावल्या चवल्या गोळा करण्यासाठीं सर्व गोष्टींवर, ह्मणजे–कर्तव्यावर, वजनावर व अब्रूवर– पाणि सोडण्यास किती तयार आहेस, तेंही मी पाहिलें आहे. तुला हल्लीं सल्ला मिळते ती वाईट मिळते, चांगली मिळत नाहीं. तुं आपल्या बराबर असण्यासाठीं असे शिष्ये शोधून काढले आहेस कीं, ते कोणास यश देणारे नव्हत; त्यानांच त्वां निवडुन काढण्याचें कारण हेंच कीं, ते, ज्या वस्तू तूं इतर मुलांस विकतोस त्यांत तुला नफा करून देतात; पण आतां पहा हा

त्याचा परिणाम. जर करतां * बेन आणि † ह्यू यांसारखे आज तुझे शिष्ये असते, तर ही लाजिरवाणी गोष्ट कधीं घडून आली नसती; हें तुला देखील पक्कें ठाऊक आहे. इतर पट्ट शिष्यां पासून प्रतिष्ठा मिळावी म्हणून तुला त्यांनीं कसरत शिकवून तयार ठेवलें असतें, आणि हे दोघेही प्रतिस्पर्धी कधीं एकमेकाशीं हात घाईवर आले नसते. पूर्वीं पूर्वीं शाळेंतील सर्व मुलें तुला एवढीं भीत असत कीं, तूं अम्मळ आपलें बोट वर केलें ह्मणजे त्यांहीं कांपूं लागावें. पण आतां कोणी कांपत नाहीं. तुझ्या मनांतल्या गोष्टींची किंवा बोलण्याची देखील कोणी पर्वा करीत नाहीं. आणि ती कां बरें करीत नाहीं ! कारण कीं तूं नेभळा व अतिलोभी झाला आहेस आणि मुलांस तें आवडत नाहीं. ही मारामारी तूं मुळापासूनच बंद करायाची होती. आणि ती एक गोष्ट गेली तरी ज्या वेळीं त्या दोघांही मुलांनीं आपापलें अवसान खर्च करून, दोघांतून कोणाचें बळ अधिक आहे हें सिद्ध केलें, त्याच वेळीं दुसऱ्यां पट्टशिष्यांनां घेऊन, आपण मध्यें

---

* बेन्ज्यामिन् दिज्रायली, इंग्लंडचा माजी मुख्य प्रधान.
† लॉर्ड ह्यू केर्नस्, इंग्लंडचा माजी खजनिदार.

पडून तंटा मोडायाचा होता. तसें न करतां उलट तूं स्वस्थ आपल्या दुकानांत बसून राहून, मारामारी चालविण्याची सामग्री त्यानां पुरवूं लागलास, व आपल्या शाळेंतील सोबत्यांच्या बुक्यांवर व घायांवर दिंडक्या मिळविण्याचें काम मांडलेंस; ह्मणून तूं त्या दोघांचाही शत्रु झालास. बरें, कधीं तरि तुलाही मित्रांची गरज लागेल. आणि जेव्हां तुला त्यांची गरज लागेल, तेव्हां ते तुला मिळोत ह्मणजे झालें. आणि आपण होऊन कोणाची कळ नकाढणारा शांत मुलगा असा जो **उइल्यम्**, याणें आपल्याला नदीवर पाय ठेवायाला आधार मिळावा ह्मणून उपाय करून तेथें एकादी नाव ठेवूं नये, आणि एकाद्या दिवसीं छानदार सकाळच्या वेळीं येऊन तुझ्या ह्या सुंदर बेटावर एकाएकींच हल्ला करूं नये, अशी तजवीज ठेव; नाहीं तर कधीं तरी तो तसें केल्या वांचून राहणार नाहीं. याविषयीं माझी पूर्ण खात्री आहे.''

"त्या मध्यें खुद **लुईचा** अपराध आहे, **काकू**." असें **ज्यॉन** ह्मणाला;—"त्याणेंच याचें मूळ काढलें. **उइल्यम्** फक्त आपल्या 'बापाची जमीन' राखीत होता."

"बापाची जमीन! बापाच्या खापरपणज्याची जमीन!" असें ती बाई धिकारून ह्मणाली;– "खेळायाचें अर्धे पटांगण ओलांडून जाऊन एकाद्या मुलाचा पाठलाग करणें, आणि त्याचा मंडप मोडून टाकण्याचें त्याला भय दाखविणें, हें अगदीं आत्मरक्षणासारखेंच दिसतें खरें!! सहा महिने पर्यंत मोठ्या कष्टानें कसरत शिकून, नंतर ज्या भाषणापासून निश्चयात्मक तंटा उपस्थित होईल असलें भाषण करणें, हें अगदीं आत्मरक्षण खरें! आणि लुई अपराधीच असला ह्मणून काय झालें? त्याला त्या बद्दल मोठें शासन व्हायाचें तें झालें, व त्याला ह्मटली ह्मणजे ही मदत करायाची वेळ आहे. कसें काय? कोणी चुकी केली ह्मणून त्यास त्या पासून मुक्त होण्याकरितां कधीं मदत करूनये कीं काय? एकाद्या अशक्तानें आपल्या चुकीनें आपले हाल हवाल करून घेतले, ह्मणून शक्तिमानाला त्याचें संरक्षण करणें आवश्यक नव्हे काय? तथापि विजयाच्या भरानें उइल्यम् भ्रमिष्ट झाला आहे ह्मणून त्याला सबब सांगण्याला कांहीं तरी थोडें निमित्त आहे; परंतु तूं जो कठोरपणानें स्वस्थ बसून पहात होतास, त्या तुला कांहींच सबब

सांगतां येणार नाहीं. या शाळेंतील पांच पट्टशिष्यांपैकीं तूं एक पट्टशिष्य, असा जो तुला अधिकार दिला होता, त्याचा त्वां वाईट रीतीनें उपयोग केलास, या करितां तुझा हुद्दा काढून घेऊन * * * ”

असें भाषण ऐकून मध्येंच “काकू काकू, कृपाकरून या खेपेस त्याला माफी करावी.” असें बहुतेक मुलगे एकदांच ओरडून ह्मणाले;—“जेव्हां लुई आणि उइल्यम् घायाळ झाले, तेव्हां त्यांवर त्याणें फारच ममता केली. त्याणें पाणी आणून त्यांचीं तोंडें धुवावीं त्यांच्या घायांला औषधें लावावीं आणि त्यांचे करितां त्याणें सर्व काहीं करावें; यासाठीं काकू बाई कृपा करून आपण त्याला सोडावें.”

काकू बाई सद्गदित होऊन ह्मणाली, “बरें, घायाळांवर याणें फार कृपा केली, या करितां ह्या खेपेस याला अम्मळ हलकें शासन देण्या विषयींचा मी विचार करीन. कारण कीं, ज्यानची मला अजून आशा आहे कीं, शाळेंतील त्याच्या मोठ्या वजना प्रमाणें तो आपली वर्त्तणूक ठेवील; आणि जें करायाचें तें केलेंच पाहिजे, मनाला वाटई वाटतें ह्मणून तिकडे दुर्लक्ष करणें हा अधर्म आहे; तसेंच योग्य कृत्य करण्याचें

ओझें आपल्या पाठीवर असतां, तें टाकून जो पळूं पाहतो, त्याणें खरोखरच प्रत्यक्ष अन्याय केल्या प्रमाणें होतें; एकाद्या अडचणीच्या कामाला जाऊन भिडण्याचें जें सामर्थ्य त्या मध्येंच मोठेपणाची खरी परिक्षा आहे; पोकळ पराक्रम बोलून प्रसंग आला ह्मणजे हात पाय गाळणें, आणि 'दुसऱ्याच्या कामांत मी कसें मन घालूं,' असें एक भिकारनिमित्त काढून कोपऱ्यांत जाऊन बसणें ही शरमेची गोष्ट आहे; इत्यादि गोष्टी उत्तरोत्तर तो ध्यानांत ठेवीत जाईल. आणि हें बरोबर आहे कीं, जर असल्या सबबा चालूं दिल्या, आणि जर शाळेमध्यें सर्वांचा पुढारी ह्मणविणारा जो तोच चोहों कडून अडचणींत सांपडून चेंगरून गेला आहे, ही गोष्ट खरी ठरली, आणि प्रसंग पडला असतां काय युक्ति लढवावी ही ज्याला अगदीं सुचत नाहीं, असें जर असलें, तर त्याणें झटकन् पुढें होऊन एकदम कबूल करावें कीं, मला दिलेल्या अधिकाराला मी योग्य नाहीं; सर्व लोकांनां वाटलें होतें तशा योग्यतेचा मुलगा मी नाहीं; माझ्या धैर्याची उगीच पोकळ वाखाणणी लोकांनीं केली आहे; मला शूर हें नांव मिळविण्यास पडावे तितके श्रम पडले नाहींत; व

लोकांपाशीं माझें वजन पुष्कळ आहे असा मी डौल मिरवीत होतों तो सर्व खोटा आहे. आणि जर माझे सोबती न्यायान्याय न पहातां एकमेकांवर तुटून पडून आमरणांत मिटणार नाहींत अशा प्रकारच्या परस्परांवर शस्त्रानीं जखमा करूं लागले, व ज्या जखमांचें विक्राळ स्वरूप पाहून पुढें मग तेच सोबती एकमेकांचें हाडवैरी होऊन, शिवाय, मी तिऱ्हाइत असल्यावरून तटस्थ राहून त्यांची मारामारी मात्र पाहिली, या कारणामुळें माझाही ते धिकार करतील, असें जरी आहे, तथापि त्यांचा हात धरण्यास किंवा त्यांला थांबा ह्मणण्यास मी अगदीं असमर्थ आहें, असें त्याणें स्पष्ट कबूल करावें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.